# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 January 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

देशबांधव आज 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' साजरा करत आहे. या पर्वानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. सोमनाथ स्वाभिमान पर्वासह अनेक कार्यक्रमांमध्ये ते सहभागी होतील. यामध्ये राजकोट, अहमदाबाद आणि गांधीनगर इथल्या विकास कार्यक्रमांचा तसंच राजकीय कार्यक्रमांचा समावेश आहे. गुजरात इथल्या चार दिवसीय 'सोमनाथ स्वाभिमान पर्वा'ला गुरुवारी ८ तारखेला प्रारंभ झाला असून इसवी सन १ हजार २६ मध्ये सोमनाथ मंदिरावर महमूद गजनीने केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हे पर्व आयोजित करण्यात आलं आहे.

पंतप्रधान मोदी आज संध्याकाळी सोमनाथ इथं पोहोचतील आणि सोमनाथ मंदिरातल्या ओंकार मंत्रोच्चारणात सहभागी होतील, या ठिकाणी ड्रोन-शो आणि उद्या च्या शौर्य यात्रेत ते सहभागी होतील. सोमनाथ मंदिराचं रक्षण करताना आपले प्राण गमावणाऱ्या योद्ध्यांना श्रद्धांजली देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार दोन जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात देशाच्या एकूण परकीय चलनसाठ्यात तब्बल ९ पूर्णांक ८०९ अब्ज डॉलर्सची घट नोंदवली गेली आहे. चलनसाठा ६८६ पूर्णांक ८०१ अब्ज डॉलर्सवर घसरला असून याआधीच्या आठवड्यात चलनसाठ्यात ३ पूर्णांक २९३ अब्ज डॉलर्सची वाढ झाली होती. एका आठवड्यातच हा बदल झाल्यामुळे आर्थिक तज्ज्ञांनीही चिंता व्यक्त केली आहे. जागतिक आर्थिक बाजारातील चढउतार, डॉलरची वाढती मजबुती आणि इतर प्रमुख चलनांतील कमकुवतता यांचा

या घसरणीवर थेट परिणाम झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार विदेशी चलन आस्थापना म्हणजेच फॉरेन करन्सी ॲसेट्समध्ये सर्वाधिक घट झाली आहे.

****

मुंबईच्या गोरेगाव पश्चिम परिसरात भगतसिंग नगरमध्ये एका घराला आज पहाटे तीन वाजेच्या सुमारास लागलेल्या आगीत तिघांचा मृत्यू झाला, यात दोन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. आग लागल्याची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणली, मात्र घरात झोपलेल्या तिघांचा गुदमरून मृत्यू झाला.

****

श्री संत वामनभाऊ महाराज यांची ५० व्या पुण्यतिथी आणि सुवर्णकलश रोहण समारंभात श्री क्षेत्र गहिनीनाथ गड इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज उपस्थिती लावली. नाथपरंपरेतील गहिनीनाथ महाराजांची परंपरा चालवणारे वामनभाऊ महाराजांनी समाजात एकोपा आणला समाजातील प्रत्येक व्यक्तीला आचरण आणि एकोप्याचा संदेश दिला असे यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

****

राज्याचा सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि एनएफडीसी यांच्या सहकार्याने मुंबईत आयोजित २२ व्या थर्ड आय आशियायी चित्रपट महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. महोत्सवाचे अध्यक्ष किरण शांताराम यांच्या हस्ते सुप्रसिद्ध दिग्दर्शिका पद्मभुषण सई परांजपे यांना ‘आशियाई चित्रपट संस्कृती पुरस्कार’ आणि दिग्दर्शिका उमा दा कुन्हा यांना ‘सत्यजित रे स्मृती पुरस्कार’ देऊन यावेळी सन्मानित करण्यात आलं. १५ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या सात दिवसांच्या या महोत्सवात विविध आशियाई देशांतील चित्रपट दाखवण्यात येणार आहेत.

****

१२ जानेवारी रोजी राष्ट्रीय युवा दिनाचं औचित्य साधून राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशानं यवतमाळ इथं “संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५-२६” या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

या राज्यस्तरीय उपक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये संविधानातील मूल्य, मूलभूत अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत सहभागी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन स्वरूपात १५ दिवसांचे प्रशिक्षण राबवण्यात येणार आहे.

****

राज्यात यंदा रबी हंगामातील सरासरी पेरण्या उद्दिष्टापेक्षा जास्त झाल्या आहेत.
मुख्य पीक असलेल्या गहू आणि हरभऱ्याच्या शंभर टक्के पेरण्या पूर्ण झाल्या असून ज्वारीची पेरणी ८४ टक्क्यांवर पोहोचली आहे. एकंदर रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीनं सरासरी ओलांडली असून १०१ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. राज्यात यंदा पाण्याची उपलब्धता चांगली असून यापुढेही हवामानाने अनुकूल साथ दिल्यास रब्बी हंगाम चांगला होण्याचा प्राथमिक अंदाज पुणे कृषी विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.
ज्वारीची पेरणी सरासरी क्षेत्रांहून जास्त होण्याची अपेक्षा मात्र पूर्ण झालेली नाही. राज्यात सरासरी सुमारे १५ लाख हेक्टर क्षेत्रात सुमारे साडे बारा लाख हेक्टरवर ज्वारीचा पेरा पूर्ण झाल्याचं कृषि आयुक्तालयाच्या अहवालात म्हटलं आहे. जनावरांच्या चाऱ्यासाठी ज्वारीच्या कडब्याप्रमाणेच मक्यालाही अधिक मागणी असल्यामुळे शेतकऱ्यांनी ज्वारीबरोबरच मका पिकाच्या पेरणीला प्राधान्य दिल्याचं दिसून येत आहे. मक्याच्या ३ लाख ७५ हजार हेक्टर सरासरी क्षेत्रात ५ लाख ४० हजार हेक्टरवर म्हणजे एकूण १४४ टक्के पेरणी झाली आहे.

****